सकाळ
नाशिक, शनिवार, २३ एप्रिल २०१६

# अंजनीच्या सुता तुला रामाचं वरदान...

## रामदास स्वामी मठात हनुमान जयंती उत्साहात; व्याख्यानमालेचा समारोप



गोमय हनुमानाची सजविलेली मूर्ती.

सकाळ वृत्तसेवा

उपनगर, ता. २२ : आगरटाकळी येथील रामदास स्वामी मठात हनुमान जयंती उत्साहात झाली. गोमय हनुमानाच्या मूर्तीला अलंकार, फूल-हारांनी सजविण्यात आले. सकाळी विविध धार्मिक कार्यक्रम झाले. हनुमान जन्मानंतर पाळणा म्हणण्यात आला. दुपारी महाप्रसादाचा कार्यक्रम झाला. भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती.

रामनवमीपासून सुरू झालेल्या व्याख्यानमालेचा आज समारोप झाला. छत्रपती शिवाजी महाराज पुण्यतिथी असल्याने जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश एन. के. ब्रह्मे यांच्या हस्ते शिवप्रतिमेचे पूजन करून हार अर्पण करण्यात आला.

या वेळी 'हनुमान चरित्र'वर सादर केलेल्या व्याख्यानात ऋतुजा वाळिंबे म्हणाल्या, की हनुमंत विजयाची देवता आहे. डोळस उपासना कशी करावी, हे समस्त मानवजातीला हनुमानाने शिकवले. हनुमानाने रामसेवेत आपले जीवन अर्पण केले. त्यामुळे हनुमानाचे मंदिर सर्वत्र आढळते. हनुमान ही बलबुद्धी प्रदान करणारी देवता समजली जाते. शौर्य, दक्षता, अखंड सावधानता, बलवान, धैर्यवान, अत्यंत बुद्धिमान, पराक्रमी, प्रभावी व्यक्तिमत्त्व हे सर्व गुण हनुमानात निवास करतात. संकटसमयी धैर्य कसे बाळगावे, याचा संदेश हनुमानाने दिला.

ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. विनायक गोविलकर, डॉ. राजेंद्र मुळे, ज्येष्ठ पत्रकार शैलेंद्र तनपुरे प्रमुख पाहुणे होते. समर्थांनी आपल्या हाताने मठात गोमय हनुमानाची मूर्ती स्थापन केल्याने या परिसराला वेगळेच धार्मिक महत्त्व आहे. दुपारी मठात भजने सादर करण्यात आली. हनुमानाच्या मूर्तीसमोर अभिषेक करण्यात आला. सुधीर शिरवाडकर, ज्योतिराव खैरनार, प्रकाश पवार, दिलीप कैचे, विजया माहेश्वरी यांनी संयोजन केले. गांधीनगर येथील महाबली हनुमान मंदिर, सिंधी मार्केट येथील हनुमान मंदिर, रामदास स्वामीनगर येथील बजरंगबली मंदिरात धार्मिक कार्यक्रम झाले. सायंकाळी झालेल्या भंडाऱ्याचा भाविकांनी लाभ घेतला.



**आगरटाकळी : येथील समर्थ रामदास स्वामी मठात व्याख्यानमालेच्या समारोपप्रसंगी शुक्रवारी ऋतुजा वाळिंबे. शेजारी ज्योतिराव खैरनार, सुधीर शिरवाडकर, प्रकाश पवार आदी.**